# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २० मार्च, २०१५ / फाल्गुन २९, १९३६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पूनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **परिवहन मंत्री** | |
| **(३)** | **उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४३**

---

### सिंधुदुर्ग शिक्षण प्रसारक मंडळ, कणकवली यांनी कम्युनिटी सेंटरसाठी दिलेल्या जागेचा व्यावसायीक वापर सुरु असल्याबाबत

**(१) * १००८९ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २६ मे, २००४ रोजीच्या आदेशानुसार सिंधुदुर्ग शिक्षण प्रसारक मंडळ, कणकवली या सार्वजनिक विश्वस्त संस्थेला कम्युनिटी सेंटरसाठी सर्व्हे नं. १४१ - A मौजे आंबिवली, ता. अंधेरी येथील १६६९.५ चौ. मी. जागा देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक उदिष्ट असलेल्या या विश्वस्त संस्थेने याठिकाणी कम्युनिटी सेंटर न बांधता ग्रॅन्ड इम्पोरियन बँक्वेट नावाचा एक बहूउद्देशिय मेजवाणी हॉल बांधून या संपूर्ण जागेचा व्यावसायिक वापर केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय जमिनीचा खाजगी वापर करुन शासनाचा कोटयावधी रुपयाचा महसूल बुडवल्याप्रकरणी संस्थेला दिलेल्या जागेची चौकशी करुन सदरची जागा रदद् करुन ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, दिनांक २२.९.१९९९ व शुध्दिपत्रक दिनांक २६/५/२००४ अन्वये मौजे आंबिवली ता.अंधेरी स.नं. १४१ अ येथील १६६९.५ चौ.मी. जमीन सिंधुदुर्ग शिक्षण प्रसारक मंडळ यांना कम्युनिटी सेंटरसाठी ३० वर्षाच्या भाडेपट्ट्याने काही अटी व शर्तीवर मंजूर करण्यात आली आहे.

(२) शासन पत्र महसूल व वन विभाग, दिनांक १०.०५.२००७ अन्वये सदर संस्थेने बांधकाम केलेल्या क्षेत्राच्या १५ टक्के इतके क्षेत्र अधिक लाभदायक प्रयोजनासाठी वापर करण्यास त्याचप्रमाणे संस्थेच्या कम्युनिटी सेंटरमधील सभागृहाचा बँक्वेट हॉल / इटिंग हाऊस प्रयोजनासाठी वापर करण्यास शासनाने परवानगी दिली आहे. त्यानुषंगाने सदर इमारतीच्या तळ मजल्याचा उपयोग बॅन्क्वेट हॉल / इटींग हाऊस या प्रयोजनसाठी करण्यात येत आहे.

(३) शासन मान्यतेने सदर ठिकाणी वाणिज्यिक वापर करण्यात येत असल्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घनसांवगी तालुक्यात (जि.जालना) ठिबक सिंचन बसविल्याचे दाखवून अधिकारी व एजन्सीधारकांनी लाखो रुपयांची बिले उचलल्याबाबत

**(२) * ११५४९ श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घनसांवगी तालुक्यात (जि.जालना) ठिबक सिंचन बसविल्याचे दाखवून अधिकारी व एजन्सीधारकांनी लाखो रुपयांची बिले उचलल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने संबंधित अधिकाऱ्यावर आणि एजन्सीधारकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशतः खरे आहे.

(२) व (३) होय, ठिबक सिंचन संच न बसविता बसविल्याचे दाखवून अनुदान काढणे, मार्गदर्शक सुचनांनुसार देय असलेल्या अनुदानापेक्षा जास्त अनुदान काढणे याबाबी चौकशीमध्ये आढळून आल्या आहेत. दोषी आढळून आलेल्या वितरकास वसूलपात्र रकमेचा भरणा करण्याबाबत कळविण्यात आले आहे, तसेच आपली नोंदणी का रद्द करण्यात येऊ नये व आपले नाव काळ्या यादीत का टाकण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा मागविण्यात आला आहे. पुरवठादार कंपनीच्या प्रतिनिधीस आपणाविरुध्द कायदेशीर कार्यवाही का करु नये, याबाबतची विचारणा करणारी नोटीस देण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे प्राथमिक चौकशी अहवालानुसार दोषी आढळून आलेल्या संबंधित तालुका कृषि अधिकारी व मंडळ कृषि अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीसीद्वारे खुलासा मागविण्यात आला आहे. सदर खुलासा प्राप्त झाल्यानंतर त्यांचेविरुध्द पुढील प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शेगांव जवळील (जि.बुलडाणा) वाघोली जंगलातील मेसा येथून बंधा-याचे दगड ट्रॅक्टर व्यावसायिकांनी रेतीसोबत चोरी करुन त्यांची विक्री केल्याबाबत**

**(३) * ८६७० श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगाव जवळील (जि.बुलडाणा) वाघोली जंगलातील मेसा येथून जाणा-या नाल्यावर वनविभागामार्फत लाखो रुपये खर्चून मागील वर्षी बांधण्यात आलेल्या बंधा-याचे दगड परिसरातील ट्रॅक्टर व्यवसायिकांनी रेतीसोबत चोरी करुन त्यांची विक्री केल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) प्रश्नात नमूद क्षेत्र बुलढाणा जिल्ह्यात नसून चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यात आहे. चंद्रपूर वन विभागातील वरोरा वन परिक्षेत्रातील वाघोली, मेसा जंगलातील नाल्यांवर सन २०१०-११ मध्ये बंधारे बांधण्यात आले आहेत. वन विभागाने तक्रारीच्या अनुषंगाने जानेवारी, २०१५ मध्ये चौकशी केली असता, बंधा-याचे दगड चोरी करुन विक्री केल्याचा प्रकार आढळून आला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धुळे जिल्ह्यातील महामार्ग विस्तारीकरणासाठी भूसंपादन व मूल्यांकन गैरव्यवहार प्रकरणातील अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत**

**(४) * ११८१४ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील महामार्ग विस्तारीकरणासाठी भूसंपादन व मूल्यांकन यामध्ये बनावट दस्तऐवजाद्वारे शासनाकडून मिळणा-या अनुदानात अधिका-यांनी गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरव्यवहाराप्रकरणी चौकशीनुसार धुळे येथील तीन उपजिल्हाधिकारी, जिल्हा अधिक्षक व कृषी अधिका-यासह एकूण १४ संशयितांविरुध्द माहे जानेवारी, २०१५ मध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गैरव्यवहार प्रकरणातील गुन्हेगारांवर काय कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

तथापि सदर प्रकरणी त्रयस्थ व्यक्ती श्री. संतोष गुलाबराव बावीस्कर यांनी मा. न्यायालय, धुळे यांच्यासमोर तक्रार दाखल केली होती. मा.न्यायालय (कनिष्ठ स्तर), धुळे यांच्या आदेशानुसार सदर प्रकरणाचा तपास करुन पुढील कार्यवाही करण्याबाबत पोलीस निरीक्षक, धुळे यांना आदेशित केलेले आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) मा. न्यायालय, धुळे यांच्या आदेशानुसार कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**लाखांदूर (जि.भंडारा) येथे एस.टी.चा डेपो सुरु करण्याबाबत**

**(५) * ९७५७ श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर हे तालुक्याचे ठिकाण असून लाखांदूर येथून नागपूर, हैद्राबाद, रायपूर, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूरला जोडणारे रस्ते असून दळणवळणासाठी लाखांदूर येथून हजारो प्रवासी दैनंदिन प्रवास करीत असतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाखांदूर येथे राज्य महामार्गावर १० वर्षापासून एसटी बसस्टँड व डेपोकरीता ८ एकर जागा उपलब्ध असून तेथे फक्त एसटी स्टँड बनविण्यात आले, त्यामुळे नागरिकांकडून वारंवार डेपो सुरु करण्याची मागणी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भौगोलिक परिस्थिती पाहता लाखांदूर येथे डेपो सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) लाखांदूर येथून दिवसभरात जाणा-या व येणा-या एकूण ४० फे-यांद्वारे प्रवासी सेवा देण्यात येते. येथील प्रवाशी वाहतूक पाहता सध्याची बसस्थानकाची व्यवस्था पुरेशी आहे. त्यामुळे येथे बस डेपो बांधणे प्रस्तावित नाही.

-----------------

**मुंबई उपनगरातील गोरेगाव येथील दूध सागर सोसायटीच्या रहिवाशांनी खोटे अभिलेखे तयार करुन शासनाची जमीन मिळविल्याबाबत**

**(६) * ५५६४ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील गोरेगाव येथील दूध सागर सोसायटीच्या रहिवाशांनी आदिवासी असल्याचे भासवून तसेच खोटे अभिलेख तयार करुन शासनाची जमीन मिळविल्याबाबत चौकशी करण्याची मागणी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत दोषी आढळून येणा-या संबंधितांवर शासनाने काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही. तथापि, यासंदर्भात ०२/०१/२०१५ रोजी एका दैनिकात बातमी आल्याचे दिसून येते.

(२) वृत्तपत्रातील बातमीची शहानिशा केली असता आरोप वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचे आढळून आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उत्तरमांड (ता.पाटण,जि.सातारा) प्रकल्पाच्या भिंतीलगत बेकायदेशीर गौण खनिजाचे उत्खनन होत असल्याबाबत**

**(७) * १०२०४ श्री.शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील पाटण तालुक्यात कृष्णा खोरे विकास महामंडळातंर्गत उत्तरमांड हा मध्यम धरण प्रकल्प साकारण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान उत्तरमांड धरण प्रकल्पाच्या भिर्तीलगतच बेकायदेशीर गौण खनिजाचे उत्खनन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उत्तरमांड धरण प्रकल्पाच्या भिर्तीलगत गौण खनिजाचे बेकायदेशीरपणे उत्खनन करण्यात येत असल्याची माहिती उत्तरमांड धरण व्यवस्थापनाचे उप अभियंता यांनी महसूल विभागास दिली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, धरण प्रकल्पाच्या भिंतीलगत गौण खनिजाचे बेकायदेशीरपणे उत्खनन करण्यात येत असल्याची माहिती मिळूनही दोषींवर कडक कारवाई न करणा-या महसूल विभागाच्या संबंधित अधिका-यांवर शासन काय कारवाई करणार आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) उत्तरमांड धरणाचे सहायक अभियंता यांनी दिनांक १ डिसेंबर, २०१४ च्या पत्रान्वये तहसिलदार पाटण यांना उत्तरमांड धरणाच्या खालील बाजूस पडलेल्या दगड, मातीच्या ढिगाऱ्यातून २० ब्रास खडी वाहतुकीसाठी श्री.निनाईदेवी मजूर सहकारी संस्था, पाटण यांना स्वामित्वधन भरुन घेऊन परवानगी देण्याची विनंती केली होती. त्यानुसार तहसिलदार पाटण यांनी उक्त संस्थेकडून स्वामित्वधन भरुन घेऊन, वाहतुकीची परवानगी दिली आहे. तेव्हा धरण प्रकल्पाच्या भिंतीलगत अवैध उत्खनन झालेले नसल्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे चिखले (ता. डहाणू, जि. पालघर) येथील शासनाच्या जमिनीवर अनधिकृत घरांचे बांधकाम केल्याबाबत**

**(८) * १३६३३ श्री.कृष्णा घोडा (पालघर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चिखले (ता. डहाणू, जि. पालघर) येथील स.नं./ ग.नं.२१९/३० क्षेत्र ०.१०.१ हेक्टर आर या जमिनीवर अनधिकृतपणे १८ मिटर लांब व ६.५० मिटर रुंद व ९.०० मिटर उंच असलेल्या घराचे बांधकाम व ७५.०० मिटर लांब व ०.५० मिटर रुंद व ३.०० मिटर उंच वॉल कंपाऊंडचे बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृत बांधकाम करणा-या मालकांवर तहसिलदार कार्यालय, ता.डहाणू, जि.पालघर यांनी दि. ३.११.२०१४ रोजी सदरहू बांधकाम पाडण्याची नोटीस बजावूनही आजपर्यंत कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बांधकाम पाडण्याबाबत कोणती कारवाई करण्यात येणार आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय हे अंशतः खरे आहे.

(३) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ५३ अन्वये सदर अनधिकृत बांधकाम दिनांक १२.०३.२०१५ पर्यंत दूर करणेसाठी गट विकास अधिकारी पंचायत समिती डहाणू यांचेकडील पत्र क्रमांक पंसड/ग्रापं/वशी - २९३ दिनांक ०३.०३.२०१५ अन्वये सरपंच व ग्राम विकास अधिकरी यांना कळविण्यात आले होते परंतु दिनांक १३.०३.२०१५ पर्यंत सदर अतिक्रमण/ अनधिकृत बांधकामाबाबत कोणतीही कारवाई केलेली नसल्याने श्रीमती तनुजा

सावे, ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत चिखले यांनी कर्तव्यात कसूर केल्याने त्यांची एक वेतनावाढ बंद करण्यात आली आहे. तसेच सरपंच श्री.संदेश रघुनाथ काटेला, ग्रामपंचायत चिखले यांचेविरुध्द दिनांक १३.०३.२०१५ अन्वये मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३९ (१) नुसार कारवाई करणेसाठी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, डहाणू यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांचेकडे प्रस्ताव सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जाम (चौरस्ता) (ता.समुद्रपूर, जि.वर्धा) येथील बस स्थानकात मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करण्याबाबत**

**(९) * १२७७७ श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जाम (चौरस्ता) (ता.समुद्रपूर, जि.वर्धा) येथील बस स्थानकात अपु-या सोयी-सुविधांमुळे प्रवाशांची प्रचंड गैरसोय होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बस स्थानकात मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्याबाबतची मागणी प्रहार संघटनेने परिवहन महामंडळाला निवेदन देऊन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने जाम (चौरस्ता) येथील बस स्थानकात मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.

(२) अशा स्वरुपाचे निवेदन प्राप्त झालेले आहे.

(३) जाम बस स्थानकावर सकाळी ६ ते रात्री १० वा. पर्यंत दोन पाळीत वाहतूक नियंत्रक कार्यरत आहेत. बस स्थानकावर दिवसभरात ६३६ रा.प.बसेस येतात/जातात. प्रवाशांकरीता बस स्थानकावर पिण्याच्या पाण्याचा पुरवठा ग्रामपंचायतीतर्फे केला जातो. परंतू पाण्याचा दाब कमी असल्याने पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होत नसल्याने बस स्थानकाच्या बाजूला असलेल्या शीव मंदीर ट्रस्ट तर्फे पाणी घेऊन पाण्याच्या पुरवठयाची स्थायी व्यवस्था करण्यात आलेली आहे. बसस्थानक परिसरात प्रकाशाची (लाईट) व्यवस्था करण्यात येवून बंद असलेले दिवे बदली करण्यात आलेले आहेत. महिलांच्या स्वच्छतागृहाजवळील बंद असलेले दिवे बदलण्यात आलेले आहेत. तसेच स्वच्छतागृह व त्या परिसराची साफसफाई नित्यनियमाने दररोज करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हिंडाल्को कंपनीवर (जि.कोल्हापूर) गुन्हा दाखल होऊनही**
**अवैध बॉक्साईट उत्खनन सुरु असल्याबाबत**

**(१०) * ११७५६ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील शाहूवाडीसह चार तालुक्यामध्ये प्रचंड प्रमाणात बॉक्साईट उत्खनना प्रकरणी चौकशीच्या अहवालानुसार हिंडाल्को या कंपनीवर गुन्हा दाखल होऊनही अवैध उत्खनन होत असल्याने शासनाचा महसूल बुडत असूनही या कंपनीवर कारवाई करण्यास संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याबाबतची तक्रार मा.मुख्यमंत्री यांना माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने कंपनीची चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार संबंधित कंपनीवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, या कंपन्यांवर कारवाई करण्यास दुर्लक्ष करणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) अशा आशयाची तक्रार मा.मुख्यमंत्री यांना जानेवारी, २०१५ मध्ये दिली असल्याचे आढळून आलेली नाही. तथापि, याच विषयावरील स्थानिक लोकप्रतिनिधींचे दिनांक ०१.०५.२०१४ चे निवेदन तात्कालीन मा.मुख्यमंत्री यांना प्राप्त झाले होते.

(२), (३) व (४) कंपनीने केंद्र शासनाच्या वन व पर्यावरण विभागाकडून तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून आवश्यक परवानग्या प्राप्त करुन घेतल्या आहेत. या कंपनीविरुध्द अवैध उत्खनना संदर्भात कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे महानगरपालिकेच्या हद्दीलगतच्या १४ गावांतील टेकड्या फोडून दोन**
**हजारांहून अधिक बेकायदा बांधकामे केल्याबाबत**

**(११) * ८२४३ श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीलगत असलेल्या १४ गावांतील टेकड्या फोडून दोन हजारांहून अधिक अनधिकृत बांधकामे उभी राहिली असल्याची बाब दिनांक २७ डिसेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृत बांधकामे कारताना ऐंशीहून अधिक ठिकाणी विनापरवाना उत्खननही करण्यात आले असल्याचा पुणे महानगरपालिकेने याबाबतचा अहवाल तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) पुण्यातील बिबवेवाडी व गंगाधाम परिसरातही मोठ्या प्रमाणात टेकडीफोड करुन सपाटीकरण करण्यात आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग १, २, व ३ यानूसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, अद्याप याप्रकरणी कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३), (४) व (५)

पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीविस्ताराच्या उंबरठ्यावरील १४ गावात टेकड्यांवर अनधिकृत गौणखनिज उत्खननाची एकूण ४७ प्रकरणे व १९५३ बांधकामांची प्रकरणे दृष्टोपत्तीस असलेली आहेत. सदर प्रकरणी तहसीलदार हवेली यांनी नियमानुसार कार्यवाही सुरु केली असून गौण खनिज उत्खननाच्या ४७ प्रकरणात रु..१६,८३,६५,१२२/- इतका दंड आकारण्यात आला आहे.

सदर १४ गावे पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट करणेबाबतची अंतिम अधिसूचना अद्याप प्रसिध्द झालेली नाही. तसेच सदर भागात अनधिकृत बांधकाम करताना ऐंशीहून अधिक ठिकाणी विनापरवाना उत्खनन करण्यात आले असल्याविषयी पुणे महानगरपालिकेने कोणताही अहवाल तयार केलेला नाही.

पुण्यातील बिबवेवाडी व गंगाधाम परिसरात टेकडीफोड करुन सपाटीकरण करण्याचे काम हे वैयक्तीक छोटी बांधकामे करताना काही ठिकाणी झाले आहे. ही वस्तुस्थिती आहे. अशा प्रकरणी कायद्यातील तरतुदीनुसार पुणे महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) बस स्थानकातील गैरसोईमुळे प्रवाशांना अनेक समस्यांना तोंड दयावे लागत असल्याबाबत

**(१२) * ९५०७ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) बस स्थानकातील गैरसोईमुळे प्रवाशांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बस स्थानकांच्या इमारतीच्या धोकादायक स्लॅब, जीर्ण झालेल्या भिंती, पोलीस चौकी व वाहनासाठी पार्किंगचा अभाव, बस स्थानकातील मोठ्या प्रमाणात पडलेले खड्डे, दुरवस्थेतील स्वच्छतागृह व बस स्थानकाच्या परिसरात सुरु असलेला वेश्या व्यवसाय अशा अनेक कारणास्तव नागरिकांना मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग क्र.२ बाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रवासी संघटनांनी व नागरिकांनी बस आगार प्रमुखांकडे वारंवार तक्रार करुन सुध्दा कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

प्रवाशांची काही प्रमाणात गैरसोय होत आहे. रा.प.पनवेल बसस्थानकाच्या एकूण चार शेड्स असून पैकी कोकण व घाटावर जाणा-या प्रवाशांकरीता असलेल्या बसस्थानकाची कॉंक्रीटची इमारत जुनी झाली असल्याने ती पाडण्याबाबतची कार्यवाही सत्वर करण्यात येत आहे. सदर बसस्थानकाच्या छताचे निखळलेले प्लास्टर काढून घेण्यात आले आहे. सदर बसस्थानकात पोलीस चौकीची व्यवस्था आहे. राज्य परिवहन बसेसच्या पार्कीगकरीता वाहनतळ आहे. बसस्थानकाच्या आगमन व निर्गमन द्वारावरील खड्डे कॉंक्रीटीकरणाने भरुन घेतलेले आहेत. वाहनतळावरील खड्डे कॉंक्रीटीकरणाने भरण्यासाठी कामाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. वाहनतळावरील खड्डे सत्वर भरुन घेण्यात येत आहेत. बसस्थानकातील स्वच्छतागृह सुलभ इंटरनॅशनल ही संस्था चालवत असून स्वच्छतागृह सुस्थितीत आहे. बसस्थानकामध्ये कोणत्याही प्रकारची अनैतिक कृत्ये चालत नसून त्या अनुषंगाने झालेल्या तक्रारीबाबत आगार व्यवस्थापक पनवेल यांनी पोलीस खात्याच्या मदतीने बसस्थानकावर कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे चालणार नाहीत याबाबत योग्य ती कार्यवाही केली आहे.
(३) व (४) प्रवाशी संघटना स्थानिक लोक प्रतिनिधी व नागरिक यांनी वेळोवेळी केलेल्या सुचनांचा विचार करुन प्रवाशांना असुविधा होणार नाही याबाबत रा.प.महामंडळाकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भूम तालुक्यात (जि.उस्मानाबाद) महावितरणाकडून मिटर रिडींग न घेता जादाची विद्युत देयके दिल्याबाबत**

**(१३) * ११०३३ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भूम तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) मीटर रिडिंग फोटोसह देण्यात आलेल्या बिलात मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष रिडिंगपेक्षा जादाची विद्युत बिले महावितरण कंपनीकडून देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विद्युत वापरापेक्षा जादाची विद्युत बिले देणा-या अधिका-यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच जादाची विद्युत देयके कमी करुन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) होय.
(३) याबाबत १९९ वीज ग्राहकांचे वीज मीटर वाचन प्रत्यक्षात असलेल्या वापरापेक्षा जास्त घेण्यात आल्याचे आढळून आले. याबाबत संबंधीत मीटर वाचन एजन्सीला मीटर वाचन अचुक घेण्याबाबत लेखी निर्देश देण्यात आलेले आहेत. संबंधीत एजन्सीवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून एजन्सीच्या देयकातून महावितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे १९९ वीज ग्राहकांच्या चुकीच्या वाचनाबाबत दंडाची रक्कम कपात करण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(४) सदर १९९ वीज ग्राहकाची वीज बिले प्रत्यक्ष मीटर वाचनाप्रमाणे दुरुस्त करुन देण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कृषी संजीवनी योजनेतील निम्मे वीज बिल माफ झाले नसल्याबाबत**

**(१४) * १३३९६ श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने शेतक-यांसाठी कृषी संजीवनी योजनेच्या माध्यमातून एक रकमी निम्मे वीज बिल भरल्यानंतर निम्मे बिल व व्याज माफ करण्यात येते मात्र चाळीसगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी कर्ज काढून वीज बिल भरणा करुनही त्याना निम्मे बिले व व्याज माफ न करता उलट नवीन बिलाच्या आकारणीसह वीज बील देण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज वितरण कंपनीने शेतक-यांच्या केलेल्या फसवणूकीसंदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्ह्यातील वासूली परिसरात अवैध मुरुम उत्खनन केले जात असल्याबाबत**

**(१५) * १२३९७ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील वासूली परिसरात चाकण एमआयडीसी टप्पा क्र.२ मध्ये मोठ्या प्रमाणात अवैध मुरुम उपसा केला जात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार अवैध मुरुम उपसा करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली जाणार आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) पुणे जिल्ह्यातील वासूली परिसर चाकण एमआयडीसी टप्पा क्र.२ मध्ये समाविष्ट असून, सदर परिसरात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत जमिनीचे भूखंड पाडून उद्योजकांना उद्योग उभा करण्यासाठी दिलेले आहेत. सदर परिसराचा बहुतांश भाग चढ-उतार व खाचखळग्याचा असल्याने जमिनीचे सपाटीकरण करणे आवश्यक आहे.

शासनाने शासन निर्णय दिनांक ०७/०१/२०११ अन्वये, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून उद्योगांना मंजूर केलेल्या भूखंडाचा विकास करताना खोदकामामधून निघालेल्या गौण खनिजाचा वापर त्याच भूखंडावर बांधकाम किंवा विकासकामासाठी केल्यास स्वामित्वधन आकारणीपासून सूट दिलेली आहे. तसेच, मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या एका याचिकेमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०३/१२/२०१४ रोजी बांधकाम करताना खोदकामामुळे निघालेले दगड-माती हे त्याच भूखंडावर जमिन सपाटीकरणासाठी वापरल्यास ते स्वामित्वधनाच्या आकारणीसाठी गौण खनिज या व्याख्येमध्ये मोडत नाहीत, अशा स्वरुपाचा निर्वाळा दिला आहे. सदर पार्श्वभूमीवर प्रस्तुत प्रकरणी संबंधितांविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आरे कॉलनी (मुंबई) परिसरातील अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या बांधकामे, बंगले आणि गोदामांवर कारवाई करण्याबाबत**

**(१६) * ६४४१ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरे कॉलनी हा मुंबईतील हरित पट्टा असून सदरहू परिसर ना विकास क्षेत्र म्हणून राज्य शासनाने घोषित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरात अनधिकृतपणे बांधकामे, बंगले आणि गोदामे उभारण्यात आल्याचे तसेच भाडेकरार संपूनही जागेचा ताबा संबंधितांनी न सोडल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन कारवाई करण्याचे आदेश मा.दुग्धविकास मंत्री यांनी दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास प्रशासनाला दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) होय हे खरे आहे.

आरे ना-विकास क्षेत्र असल्याने तेथे कुठलीही बांधकामे होऊ नयेत यासाठी शासनाकडून निश्चित अशा सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच आरे मध्ये आतापर्यंत झालेली सर्व अतिक्रमण, अनधिकृत बांधकामे, बंगले, गोदामे, इमारती यांची व परिसर सुरक्षित राहण्यासाठी करण्यात येत असलेल्या कार्यवाही बाबतची माहिती मागविली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राजधानी दिल्लीत घडलेल्या 'उबर' प्रकरणानंतर मुंबई शहरातील रिक्षा-टॅक्सीने प्रवास करणा-या महिलांच्या सुरक्षिततेबाबत**

**(१७) * १०२५० श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.भिमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजधानी दिल्लीत घडलेल्या 'उबर' प्रकरणानंतर मुंबई शहरातील रिक्षा-टॅक्सीने प्रवास करणा-या महिलांच्या सुरक्षितेचा प्रश्न ऐरणीवर आला असून या पार्श्वभूमीवर मुंबईच्या उपनगरात धावणा-या तब्बल ३५ हजार रिक्षा अनधिकृत असल्याचा दावा मुंबई ऑटोरिक्षामेन्स युनियननेच केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिवहन प्रशासनासोबत असलेल्या संबंधामुळेच एवढ्या मोठ्या प्रमाणात अवैध वाहतूक सुरु असल्याचा आरोप माहे डिसेंबर, २०१४ मधील पहिल्या पंधरवड्यात घेतलेल्या पत्रकार परिषदेत जाहिररित्या केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) मुंबई ऑटोरिक्षामेन्स युनियनकडून वारंवार परिवहन प्रशासनाकडे अवैध वाहतुकीच्या तक्रारी करण्यात आल्या असतानाही केवळ प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे, ५ वर्षापूर्वी १० हजार या प्रमाणात असलेल्या अवैध वाहतूकीत आज ४० हजारांपर्यंत वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अवैध वाहतूकीवर कायमस्वरुपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) अशा स्वरुपाचे कोणतेही निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही. तसेच ही बाब वस्तुस्थितीला धरुन नाही.
(३) हे खरे नाही.
(४) मुंबई उपनगरातील परिवहन कार्यालयांच्या भरारी पथकामार्फत ऑटोरिक्षामधून होणा-या अवैध प्रवासी वाहतुकीविरुध्द नियमित तपासणी करुन कारवाई करण्यात येते. मुंबईतील परिवहन कार्यालयांच्या भरारी पथकांनी माहे एप्रिल, २०१४ ते माहे जानेवारी, २०१५ या कालावधीत एकूण २,८३६ ऑटोरिक्षांना विविध गुन्ह्यांखाली प्रतिवेदित केले आहे.

मुंबई शहरातील अवैध वाहतुकीविरुध्द पोलीस (वाहतूक) विभागामार्फत सन २०१४ मध्ये १३०२ मोटार वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातपाटी-पालघर (जि.पालघर) इत्यादी ठिकाणी समुद्रातून सुमारे ५ कोटी रुपयाची अनधिकृत मासेमारी केल्याबाबत

**(१८) * १२२५२ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातपाटी-पालघर इत्यादी ठिकाणी नियमानुसार किना-यापासून १२ नॉटीकल मैलांपलीकडे पर्ससीन पध्दतीने मासेमारी करण्यास परवानगी असताना सुध्दा माहे जानेवारी, २०१५ मध्ये ५०० पर्ससीन मच्छीमार बोटींनी माहिम-सातपाटी-पालघर येथील समुद्रातून सुमारे ५ कोटी रुपयांची अनधिकृत पणे मासेमारी केल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतक्या मोठया प्रमाणात पर्ससीन बोटी किना-याजवळ येऊन मच्छिमारी करुन जातात यासंबंधी स्थानिक मच्छिमारांनी वेळोवेळी तक्रारी करुनही मत्स्यव्यवसाय विभागातील संबंधित अधिकारी या प्रकरणी कोणतीही कारवाई करत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत पर्ससीन बोटीविरुध्द माहिम-सातपाटी समुद्र क्षेत्रात घुसखोरी करुन

केलेल्या अवैघ मासेमारीबद्दल स्थानिक वडराई मच्छीमार सहकारी संस्थैने मत्स्यव्यवसाय विभागाच्या पालघर कार्यालयात तक्रारी देऊनही त्याविरुध्द अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून संबंधितांविरुद्व कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.

(२) नाही.

विभागाने भाडे तत्वावर घेतलेल्या गस्ती नौकाद्वारे गस्त घालण्यात येऊन पारंपारिक मच्छिमारांच्या हिताची व मत्स्यसाठ्याची जपणूक केली जाते.

(३) नाही. संस्थेकडून तक्रार प्राप्त होताच तात्काळ गस्तीनौका उपलबध करुन त्या क्षेत्रात गस्त घालण्यात आलेली आहे.

(४) डहाणू कार्यक्षेत्रात गस्तीनौकाद्वारे ५ अवैध नौकांविरुध्द प्रतिवेदने दाखल करण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आकोट (जि.अकोला) येथील पोपटखेड लघुपाटबंधारे प्रकल्पाअंतर्गत बाधित १५४ कुटूंबाचे पुनर्वसनाबाबत

**(१९) * १३५३८ श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आकोट (जि.अकोला) येथील पोपटखेड लघुपाटबंधारे प्रकल्पाअंतर्गत बाधीत १०८ घरे व कुंटुबाचे अंशतः पुनर्वसन करण्यात आले, परंतु ऊर्वरीत १५४ कुटूंबाचे अद्यापी पुनर्वसन न झाल्याने ते वंचित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापी १५४ कुटुंबाचे पुनर्वसन तातडीने न केल्यास ते धरणक्षेत्राच्या ७५ मिटर अंतरावरील येत असल्याने तसेच धरणाचे नाल्यामधुन येणारे पाणी हे खालचे बाजुस जमा होत आहे त्यामुळे त्याचे जिवीतास व आरोग्यास धोका होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी गेल्या १० ते १५ वर्षापासून सदर कुटुंबाचे तातडीने पुनर्वसन न करण्याचे प्रमुख कारणे काय,

(४) असल्यास, यावर शासनाने कुटुंबाचे तातडीने पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) पोपटखेड लघूबंधारे योजनया प्रकल्पांच्या बुडीत क्षेत्रात येणा-या १०८ घरांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. पुनर्वसनाचे नियमानुसार पूर्ण संजय पातळीपासून ७५ मी. चे आतील सर्व घरांचे पुनर्वसन करणे बावश्यक आहे. तथापि १५४ कुटूंब हे धरण रेषेच्या खालच्या बाजूस असल्याने बाधित होत नाही. त्यामुळे १५४ कुटूंबाचे पुनर्वसनाचा प्रश्न उद्‌भवत नाही. धरणाच्या नाल्यातून (C-Drains) येणा-या पाण्यामुळे आरोग्य धोका असणेबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भतव नाही.

-----------------

**सारुळ, विल्होळी (जि.नाशिक), खेड तालुका व अगळंबे (ता.हवेली जि.पुणे) परिसरात बेकायदेशीररित्या गौण खनिज आणि दगडांची चोरी होत असल्याबाबत**

**(२०) * ११७३४ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.सुभाष साबने (देगलूर), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सारुळ, विल्होळी (जि.नाशिक) येथे होणा-या अवैध गौण खनिज उत्खननाबाबत तलाठी यांनी तहसिलदारास अहवाल सादर करुनही तहसिलदाराने त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे तेथे उघडपणे उत्खनन चालू असल्याचे माहे फेब्रुवारी,२०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, खेड तालुका व अगळंबे ता.हवेली (जि.पुणे) येथे सुध्दा अनधिकृतरित्या गौण खनिजांचे उत्खनन सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती या प्रकरणी दोषी अधिकारी व कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) मौजे सारुळ व मौजे विल्होळी, ता. व जि.नाशिक येथील अवैध उत्खननाबाबत तलाठी व मंडळ अधिकारी पाथर्डी यांनी तहसिल कार्यालयात सादर केलेल्या ४ अहवालांपैकी, एका अहवालाच्या अनुषंगाने संबंधितांकडून अनधिकृत गौण खनिज उत्खननापोटी दंडाच्या वसुलीची कार्यवाही पूर्ण झाली असून, ३ अहवालांनुसार नोटीस देऊन संबंधितांचा खुलासा मागविण्याची कार्यवाही सुरु आहे व १० स्टोनक्रशर सिल करण्यात आले आहेत.

पुणे जिल्हयातील मौजे अगळंबे, ता.हवेली येथे गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीची प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली नाहीत. तथापि, राजगुरुनगर (खेड) तालुक्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली असून,

सन २०१४-१५ या वर्षात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या १३ प्रकरणांमध्ये रुपये २,४८,००० /- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई, ठाणे शहरापाठोपाठ कल्याण शहरातील सीएनजी रिक्षा चालक प्रवाशांकडून पेट्रोल दरपत्रकाच्या दराप्रमाणे भाडे वसुली करत असल्याबाबत

**(२१) * ७३८४ श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई, ठाणे शहरापाठोपाठ कल्याण शहरातही सीएनजी रिक्षा सेवा झालेली असून आजमितीस शहरात ४० टक्के रिक्षा सीएनजी वर धावतात मात्र रिक्षा चालक सीएनजी दरपत्रकाऐवजी प्रवाशांकडून पेट्रोल दरपत्रकाच्या दराप्रमाणे भाडे वसुली करतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पेट्रोल दरपत्रकाच्या दराने भाडे वसुली करण्यात येत असल्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) अशा प्रकारे बेकायदेशीर भाडे वसुल करणाऱ्या रिक्षा चालकांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण यांच्या कार्यक्षेत्रात पेट्रोल इंधनावर चालणा-या रिक्षांची संख्या ८,३४०, सीएनजी इंधनावर चालणाऱ्या रिक्षांची संख्या १०,०५९, तर एलपीजी इंधनावर चालणा-या रिक्षांची संख्या १,९६२ एवढी आहे.

हकीम समितीच्या शिफारशीनुसार जोपर्यंत स्वस्त इंधनावर चालणा-या रिक्षांची संख्या महाग इंधनावर चालणा-या वाहनांपेक्षा कमी असेल तोपर्यंत सर्वच वाहनांना महाग इंधनाच्या वाहनांना देय असणा-या भाडेदराप्रमाणे भाडे आकारण्यास परवानगी देण्यात येते.

-----------------

## एकाच नोंदणी क्रमांकावर तीन ट्रक चालविण्यासंबधीत प्रकरणाची चौकशी करण्याबाबत

**(२२) * ५४९५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाहनाचा मूळ चेसिस क्रमांक घासून खोडल्यानंतर नविन बनावट क्रमांक टाकण्यात येत

असून पार्ट क्रमांक सुध्दा बदलवून बनावट क्रमांक टाकून त्याआधारे ओव्हरलोड वाहतुक करीत असल्याची माहिती वर्धा आर.टी.ओ.कडे प्राप्त होताच त्यांनी सापळा रचून सीजी ०४ जी ६३७४ या क्रमांकाचा ट्रक जप्त केला असता संबधीत आर.टी.ओ अधिकाऱ्यास दबाव टाकून जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात येत असल्याची माहिती दिनांक १० जानेवारी २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीन ट्रक खरेदी करून त्यापैकी एका ट्रकची नोंदणी छत्तीसगडमध्ये करावयाची आणि तोच नंबर इतर दोन ट्रकवर टाकून तीनही ट्रक वेगवेगळया मार्गावर चालवायचा असा गैरप्रकार करणारे रॅकेट असल्याची माहिती निर्देशनास आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करून कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) वर्धा जिल्हयात बनावट सांगाडा (चेसिस) क्रमांक असलेल्या मोटार वाहनातून वाहन क्षमतेपेक्षा जास्त माल घेऊन जाताना आढळून आले. तथापि परिवहन कार्यालयातील अधिका-यांवर दबाव अथवा जीवे मारण्याची धमकी देण्यात आलेली नाही.

(२) नाही.

(३) सदर प्रकरणी बनावट सांगाडा (चेसिस) क्रमांक असलेल्या मोटार वाहन क्रमांक CG-०४G-६३७४ च्या वाहन मालकाविरुध्द दि. ६.१.२०१५ रोजी सेवाग्राम पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ०६/१५ भा.दं.वि. कलम ४२०,४८६,४७१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासाधीन आहे. तसेच सदर प्रकरणी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, वर्धा यांचेकडून त्यांच्या कार्यालयीन तपासणी पथकास अशी वाहने वाढळून आल्यास कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धरुई (ता.मुरबाड, जि.ठाणे) परिसरातील दुकानदारांनी भेंडीच्या पिकाची मिनाक्षी जातीची बनावट बियाणे वितरीत केल्याबाबत

**(२३) * ९८३७ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धरुई (ता.मुरबाड, जि.ठाणे) परिसरातील दुकानदारांनी शेतक-यांना विक्री केलेली भेंडीच्या पिकाची मिनाक्षी जातीच्या बनावट बियाण्यांमुळे भेंडीची रोपे मरु लागल्याने लागवड केल्यापासून औषध फवारणी, मजूर, नांगरणी, खते, इत्यादीसाठीची २५ हजार रुपयांची शेतक-यांची लागत निष्फळ गेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तालुका कृषि अधिकारी मुरबाड व तहसिलदार मुरबाड यांचेकडे जानेवारी, २०१५ च्या सुमारास तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी अधिक चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार बियाणे उत्पादन करणा-या कंपनीवर व दुकानदारांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. तालुका कृषि अधिकारी, मुरबाड, पंचायत समिती, मुरबाड किंवा तहसीलदार मुरबाड तसेच जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, ठाणे, कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद ठाणे यांच्या कार्यालयाकडे याबाबत कोणतीही तक्रार आलेली नाही. तथापि दैनिक लोकमतच्या दि.१३/०१/२०१५ च्या वृत्तपत्रामध्ये अशाप्रकारची बातमी प्रसिध्द झालेली आहे.
(३) व (४) होय. प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषगाने चौकशी करुन शेतक-यांच्या शेतीची पाहणी केली असता भेंडीचे पिक चांगल्या स्थितीत असल्याचे आढळून आलेले आहे. तसेच त्याबाबत तक्रार नसल्याचे लेखी स्पष्टीकरण शेतक-यांनील दिलेले आहे. त्यामुळे कंपनी अथवा दुकानदारांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## अकोला जिल्ह्यातील मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या प्रतिबंधित क्षेत्रात अवैधरित्या खोदकाम सुरु असल्याबाबत

**(२४) * १३२०० श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या ता.अकोट जि.अकोला प्रतिबंधित क्षेत्रात अवैधरित्या खोदकाम सुरु असून आदिवासींच्या जमिनी लिजवर घेऊन आपल्या नावावर करुन कोट्यावधींच्या गौण खनिजांची सर्रासपणे चोरी सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी वरिष्ठ अधिकारी दुर्लक्ष करीत असून अवैध उत्खनन करणा-या माफियांवर कारवाई करण्यास महसूल विभागाचे अधिकारी टाळाटाळ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर काय कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२), (३) व (४) अकोट तालुक्यातील मेळघाट व्याघ्रप्रकल्पाअंतर्गत अकोट वन्यजीव विभागाच्या नरनाळा अभयारण्यात कोणतेही अवैध खोदकाम सुरु नाही. तथापि अकोला वन विभागाचे कार्यक्षेत्र असलेल्या मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे बफर झोनमधील पोपटखेड व मलकापूर भिल येथील खाणीस बफर झोन अधिसूचीत होण्यापूर्वीच महसूल विभागामार्फत परवानगी देण्यात आली असल्याने सदर खाणी सुरु आहेत. दिनांक २७.०८.२०१४ रोजी जिल्हा खाणकाम योजना २०१४ अंतर्गत जिल्हास्तरीय समितीची

जिल्हाधिकारी, अकोला यांचेकडे बैठक पार पडली असून सदर बैठकीत पोपटखेड व मलकापूर भिल येथील खाणी बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भातकुली (जि.अमरावती) तालुक्यात रेतीमाफीयांनी तलाठ्याला केलेली मारहाण**

**(२५) * ५६८६ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील भातकुली तालुक्यात रेतीची अवैधरित्या वाहतूक करणारी गाडी पकडली असता रेतीमाफीयांनी तलाठ्याला मारहाण करुन पेट्रोल टाकून जाळून टाकण्याची धमकी दिल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१५ वा त्या सुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यात रेतीमाफियांकडून महसूल विभागातील कर्मचा-यांवरील हल्लाच्या प्रकारात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणातील आरोपींवर कोणती कडक कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, याप्रकरणी अदयाप कोणतीच कारवाई झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) अमरावती जिल्ह्यातील मौजा भातकूली येथे दिनांक २९/१२/२०१४ रोजी अवैध रेती वाहतूक करीत असलेल्या ट्रॅक्टरवर कारवाई करतांना संबंधित वाहन मालक यांनी नायब तहसिलदार भातकुली व तलाठी अंतापूर यांना मारहाण केली व जिवे मारण्याचा प्रयत्न केला. सदर प्रकरणी संबंधितांविरुध्द भातकुली पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने ३ व्यक्तींना अटक करण्यात आलेली असून, आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत. प्रकरणी पोलीस तपास सुरु आहे.

अमरावती जिल्ह्यात अवैध रेती उत्खनन/वाहतूक करणा-यांकडून महसूल विभागातील कर्मचा-यांना शिवीगाळ व मारहाण केल्याच्या वर्ष २०१३, २०१४ व २०१५ मध्ये अनुक्रमे ५, १ व १ घटना घडलेल्या असून, सदर प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण- डोंबिवली (जि.ठाणे) शहरानजीक असलेल्या गांवामध्ये शासनाची परवानगी न घेता सुमारे ३० इमारतीचे अनधिकृत बांधकाम करण्यात आल्याबाबत**

**(२६) * ७०७४ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण - डोंबिवली शहरानजीक असलेल्या गांवामध्ये शासनाची परवानगी न घेता सुमारे ३० इमारतीचे अनधिकृत बांधकाम करण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास महसूल विभागाने केलेल्या सर्वेक्षणामध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशी अंती या प्रकरणी दोषी अधिकारी व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अशंतः खरे आहे.

(२), (३) व (४) तहसिलदार बिनशेती पथकाने केलेल्या शोध मोहिमेत सुमारे २८० अनधिकृत बांधकामे आढळली आहेत. नियमबाह्य बांधकाम करणा-या बांधकामाधारकांना महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४५(२) प्रमाणे दंडाच्या नोटीसा जिल्हाधिकारी, ठाणे यांच्यामार्फत बजावणेत आलेल्या असून पुढील कार्यवाही सुरु आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये सदर बांधकामाची तपासणी करुन कार्यवाही करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर प्रगतीत आहे.

-----------------

**पुणे जिल्ह्यातील आदिवासींच्या मालकीची जमीन बिगर**
**आदिवासी समाजातील व्यक्तींनी खरेदी केल्याबाबत**

**(२७)** * **८६०६ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील आदिवासींच्या मालकीची तब्बल १६४७ एकर जमीन जिल्हाधिका-यांची परवानगी न घेता बिगर आदिवासी समाजातील व्यक्तींनी खरेदी केल्याची बाब माहे डिसेंबर २०१४ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १२२ प्रकरणांमध्ये ६०० एकर जमिनीवरच्या खरेदीच्या नोंदी थांबवून ९६ खरेदी प्रकरणातील २९० एकर जमिन आदिवासींना परत करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणा-या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, कारवाईस होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव,खेड, मावळ, मुळशी व भोर तालुक्यातील एकूण ३७७ प्रकरणामध्ये आदिवासीच्या मालकीचे ६५९.१५ हेक्टर क्षेत्र परवानगी न घेता बिगर आदिवासी समाजातील व्यक्तींनी खरेदी केलयाची बाब एप्रिल, २०१३ दरम्यान उघडकीस आल आहे. सदर प्रकरणापैकी १२८ प्रकरणांतील २४८.०० हेक्टर क्षेत्राबाबत खरेदी व्यवहाराच्या फेरफार नोंदी रद्द झाल्याने किंवा नोंदी झालेल्या नसल्याने ७/१२ चे उता-यावर आदिवासींची नावे दाखल आहेत. उर्वरीत २४९ प्रकरणातील ४११.१५ हेक्टर

क्षेत्रापैकी १३४ प्रकरणात १६९.६२ हेक्टर क्षेत्र मूळ आदिवासींना परत करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे. उर्वरीत ११५ प्रकरणातील २४१.५३ हेक्टर क्षेत्राबाबत सुनावणीची कार्यवाही चालू असून आदिवासींना जमीन परत करण्याची तजवीज ठेवली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

**आचार्य विनोबा भावे यांच्या कुटुंबियांनी भूदान चळवळीत दिलेला मौजे गागोदे (जि. रायगड) गावातील १६५ हेक्टर क्षेत्राचा डोंगर विकायला काढल्याबाबत**

**(२८) * ७८१० श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आचार्य विनोबा भावे यांच्या कुटुंबियांनी भूदान चळवळीत दिलेला रायगड जिल्ह्यातील गागोदे गावातील १६५ हेक्टर क्षेत्र असलेला डोंगर गावातील काही समाजकंटकांनी ७० कोटी रुपयांना एका प्रसिद्ध उद्योगपतींना विकायला काढला असल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१५ च्या तिस-या आठवडयात निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने या प्रकरणी दोषी असलेल्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे

(३) असल्यास, या प्रकारणी अद्याप चौकशी केली नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) मौजे गागोदे बु.ता.पेण जिल्हा रायगड येथील एका जमिनीविषयी "भुदानातील डोंगर विक्रीचा घाट" अशा आशयाची बातमी दि. १९/०१/२०१५ रोजी एका वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाली होती. त्यानुषंगाने दि. २०/०१/२०१५ रोजी तहसीलदार, पेण, जि. रायगड यांनी मौजे गागोदे बु. येथे प्रत्यक्ष भेट देऊन स्थळ पाहणी व अभिलेखावरुन खात्री केली असता सदर बातमीत काहीही तथ्य असल्याचे आढळून आले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे देवघर (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) परिसरात आग लागलेल्या बागांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(२९) * १०६७० श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यातील देवघर येथे गुहागर चिपळूण रोडपासून ३

किलोमीटर परिसरामध्ये अचानक लागलेल्या आगीला वणव्याचे स्वरुप येऊन त्यामध्ये परिसरातील काजू, नारळ, आंबा बागांना आगीची झळ पोहचून मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची घटना माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) तद्नुसार उक्त नुकसानग्रस्तांना शासनाने आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्ह्यात पशुधन योजनेत पशुधन विकास अधिकारी व पंचायत समितीचे पशुधन विकास अधिकारी यांनी केलेला गैरव्यवहार

**(३०) * १३९७२ श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यात वर्ष २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये राज्य सरकारची नाविण्यपूर्ण योजना आणि राज्य आणि केंद्र सरकारच्या अन्य योजनेमध्ये स्थानीय बी.पी.एल आणि गोरगरीब लोकांना दुधाळू जनावर, शेळीगट, बैलजोडी, कोंबडी व अन्य पशू वाटप करण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पशुंच्या खरेदी मध्ये जिल्ह्यातील सहायक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुधन विकास अधिकारी आणि पंचायत समितीचे पशुधन विकास अधिकारी यांनी संगनमत करुन प्रत्यक्ष जनावरे न घेता पशु विक्रेताच्या नावाने मोठ्या प्रमाणात सरकारी निधीची अफरातफर केली आणि बनावट पशु विक्रेत्यांना रोखीने रक्कम अदा केल्याचे दाखविले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लाखों रुपयांचा निधी सरकारच्या, जिल्हापरिषदेच्या अधिकाऱ्यांद्वारे रोखीने अदा करणे हे नियमबाहय असल्याने याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.

तथापि, बैलजोडी वाटपाची योजना या विभागाकडून राबविण्यात येत नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात महावितरणच्या विज वितरण व्यवस्थेची दुरवस्था झाली असल्याबाबत**

**(३१) * १३२७५ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात महावितरणची विज वितरण व्यवस्था निकामी झाली असून रोहित्रांचे किटकॅट नसणे, केबल नसणे, रोहित्राचे ऑईल नसणे, पोल झुकलेले असणे, विद्युत लाईनच्या तारा लोंबकळत असणे आदि अनेक बाबींमुळे शेतक-यांचे शेतातील शेतीपीके शॉटसर्किटने जळून जात असल्याने मोठे नुकसान होत असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) असल्यास, सदर प्रकरणी तातडीने उपाययोजना करुन विज पुरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशतः खरे आहे. डिसेंबर - २०१४ व जानेवारी- २०१५ या दोन महिन्याच्या कालावधीत पीक जळीताच्या २ घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) लातूर जिल्ह्यातील वीज वितरण व्यवस्था सुरळीत ठेवण्याबाबत विविध उपाययोजनांचे काम प्रगतीपथावर आहे. पीक जळीत प्रकरणाची शहानिशा करुन त्यावर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रकरणी तातडीने कार्यवाही करुन विद्युत पुरवठा सुरळीत केला आहे. तसेच जुने व कालाबाह्य झालेले रोहीत्रे, पोल, तारा इत्यादी वेगवेगळ्या योजने अंतर्गच्या कामात बदलून त्या ठिकाणी नविन रोहत्रे, पोल, तारा बसवले जातात. लाईन व रोहीत्रांचे देखभालीचे काम संबंधित शाखा, उपविभाग व उपविभागीय कार्यालयाकडून नियमीतपणे करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे, चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यात खनिज अधिका-यांशी संगनमत करुन कंत्राटदार विनापरवाना व बेकायदेशिररित्या खनिज उत्खनन करीत असल्याबाबत**

**(३२) * १११६४ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंप्रीहाट (ता.भडगंव, जि.जळगाव) येथील गिरणा नदीपात्रातून, राजापूर नंबर १ (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील नदीपात्रातून, गोदावरील दुधना, पुर्णा नदीपात्रातून (जि.जालना), गिरणा नदीतून (ता.देवळा, जि.नाशिक), वर्धा नदीवरील हिवरा (दरणे) घाटातुन (ता.कळंब, जि.यवतमाळ) तसेच घाटंची, महागाव, दारव्हा तालुका (जि.यवतमाळ), कल्याण (जि.ठाणे) नगर हायवेवरुन संबंधित अधिका-यांच्या संगनताने बेकायदेशीरपणे वाळू उपसा सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बेकायदेशीर वाळू उपश्यामुळे शासनाचे महसूल बुडत असून पर्यावरणाची हानी होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी दोषी अधिकारी व कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत तसेच अनधिकृत वाळू उपसा बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) प्रश्नाधिन भागांपैकी काही भागात अवैधवाळू उत्खनन व वाहतूकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत. ही वस्तुस्थिती आहे. तथापि, अधिकाऱ्यांच्या संगनमताने अनधिकृतरित्या वाळूचे उत्खनन केले जात असल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(२), (३) व (४) मौजे पिंप्रीहाट (ता.भडगांव, जि.जळगाव) येथे सन २०१४-२०१५ मध्ये वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ६ प्रकरणांमध्ये रुपेय ९६,०००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील राजापूर - नंबर १ येथील घोड नदीपात्रातून वाळूचे अवैध उत्खनन होत असल्याचे निदर्शनास आले नाही.

जालना जिल्ह्यातील पुर्णा, दूधना व गोदावरी या नद्यामधून अवैध वाळू उत्खनन/ वाहतूक रोखण्यासाठी गठीत केलेल्या जिल्हास्तरीय पथकाने दिनांक १०/१२/२०१४ पासून केलेल्या तपासणीत संबंधितांकडून रुपये ६,२४,३५०/- एवढा दंड वसूल केला आहे.

नाशिक जिल्ह्यातील देवळा तालुक्यातील गिरणा नदीपात्रात सन २०१४-२०१५ मध्ये वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ४१ प्रकरणामध्ये रुपये १४.५८ लाख इतका दंड वसूल करण्यात आला असून, ८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीबाबत सन २०१४-२०१५ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील ३४ प्रकरणात रुपये १,९१,३५०/- घाटंजी तालुक्यात ४२ प्रकरणात रुपये १,९८,०००/- महागाव तालूक्यात ९८ प्रकरणात रुपये ११,१२,८००/- व दारव्हा तालुक्यात ९७ प्रकरणात रुपये ९,८२,३००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

ठाणे जिल्ह्यातील कल्याण तालुक्यात एप्रिल २०१३ ते फेब्रुवारी २०१५ या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणात रुपये १,३९,७४,४९८/- इतका दंड वसुल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौ.बीबी (ता.लोणार, जि.बुलढाणा) येथे अवैध प्रवाशी वाहतूक होत असल्याबाबत**

**(३३) * ७८९८ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.बीबी (ता.लोणार, जि.बुलढाणा) येथे अवैध प्रवाशी वाहतूक होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अवैध वाहतूकीकडे वाहतूक अधिकारी व कर्मचारी दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच वाहतूक कर्मचारी अवैध वसूली करुन वाहतूकीचा परवाना देतात, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.

(२) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, बुलढाणा यांचे कार्यक्षेत्रात भरारी पथकामार्फत अवैधरित्या प्रवासी वाहतूक करणा-या वाहनांची नियमित स्वरुपात तपासणी करुन कारवाई करण्यात येते.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासनाने मालती वसंत हार्ट ट्रस्ट यांना भाडेपट्टीवर दिलेली जमीन ताब्यात घेण्याबाबत**

**(३४) * १००९० श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या वतीने २९ डिसेंबर १९९७ रोजी १२०५० चौ. मी. जमीन प्लॉट नं -१ सी. टी. क्र. ८३३ सर्वे क्र - १४१ A मौजे आंबिवली, ता.अंधेरी येथील जमीन प्रतिवर्षी १ रुपया भाडेपट्टीवर मालती वसंत हार्ट ट्रस्ट यांना ३० वर्षाच्या कालावधीसाठी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ६ फेब्रुवारी २००७ रोजी तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी या संस्थेच्या विश्वस्त केलेल्या विश्वस्तांच्या बदलाबाबत शासनाची पूर्व परवानगी न घेता मालकी हक्कात बदल केल्याबद्दल या संस्थेला २००९ व या बाजारमूल्याच्या ७५ % रक्कम म्हणजे १७४.८८ कोटी रुपये शासनाकडे भरावे असे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची जागा १ रु नाममात्र भाड्याने दिली असल्याने या जागेचा व्यावसायीक कारणासाठी वापर करण्यात आला असल्याने याबाबत ट्रस्टला नोटीस देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाचे १७४ कोटी रुपये नुकसान करण्यात आल्याबाबत सदर ट्रस्टची जमीन ताब्यात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) यासंदर्भात जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी संबंधितांना दिनांक ६.२.२००७ रोजी नोटीस बजावली होती. हे खरे आहे. मात्र , सदर नोटीसीमध्ये अनर्जित रक्कमेचा आकडा नमूद केला नव्हता.

(३) होय. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक १७.७.२०१० रोजी ट्रस्टला शर्तभंगासंदर्भात नोटीस दिली होती.

(४) प्रस्तुत प्रकरणी, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक २४.२.२०१२ व दिनांक २.१२.२०१४ रोजी आदेश पारीत केले आहेत. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या दिनांक २.१२.२०१४ रोजीच्या आदेशाविरुध्द भाडेपट्टेदार यांनी शासनाकडे पुनरिक्षण अर्ज दाखल केला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**उस्मानाबाद जिल्ह्यात वार्षिक सरासरीच्या तुलनेत अतिअल्प पाऊस झाल्याने ७३७ गावातील तीन लाख ८३ हजार शेतक-यांच्या शेती पिकांचे, फळबागांचे नुकसान झाल्याबाबत**

**(३५) * ११०३५ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यात सन २०१४-२०१५ यावर्षी वार्षिक सरासरीच्या तुलनेत अतिअल्प पाऊस झाल्याने ७३७ गावातील तीन लाख ८३ हजार शेतक-यांच्या शेती पिकांचे, फळबागांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच जिल्ह्यातील पिकांची आणेवारी मोठ्या प्रमाणात ५० पैश्यांपेक्षा कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार जिल्हा टंचाईग्रस्त समजून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) उस्मानाबाद जिल्ह्यातील ७३७ गावांतील बाधित अल्प व अत्यल्प भुधारक शेतकऱ्यांची संख्या २,८१,०९६ इतकी असुन बहुभुधारक बाधित शेतक-यांची संख्या १,०२,१९२ इतकी आहे.

बाधित शेतक-यांना अर्थसहाय्य करण्यासाठी शासन निर्णय दि. ०७.०१.२०१५ व दि. ०२.०२.२०१५ अन्वये उस्मानाबाद जिल्ह्याकरीता अनुक्रमे रु. ७३.४७ कोटी व रु. ७३.५३ कोटी याप्रमाणे एकूण रु. १४७.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

तसेच शासन निर्णय दि. २५.०१.२०१५ अन्वये सन २०१४-१५ च्या खरीप हंगामातील उस्मानाबाद जिल्हामधील ३८१ गावांची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आढळून आल्याने तेथे टंचाईसदृश्य परिस्थिती जाहीर करुन विविध उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चाकण परिसरात (जि.पुणे) खराबवाडी हद्दीतील टेकडी फोडून**
**कारखाने उभे करण्याचे काम सुरु असल्याबाबत**

**(३६) * १२३९९ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण परिसरात (जि.पुणे) उद्योगांच्या उभारणीसाठी खराबवाडी हद्दीतील वाघजाईनगर येथिल ॲडविल हायटेक कंपनीसमोरील टेकडी फोडून कारखाने उभे करण्याचे काम सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधित कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४)

पुणे जिल्ह्यातील खराबवाडी परिसर हा चाकण एम.आ.डी.सी. मध्ये समाविष्ठ असून तेथे एम.आय.डी.सी. ने जमिनीचे भूखंड पाडून अद्योजकांना उद्योग उभे करण्यासाठी दिले आहेत. सदर परिसराचा बहुतांश भाग हा चढउताराचा व खाचखळग्याचा असल्याने उद्योग उभारणीसाठी जमिनीचे सपाटीकरण करणे आवश्यक आहे. शासनाने शासन निर्णय दि.०७/०१/२०११ अन्वये एम.आय.डी.सी. क्षेत्रातील भूखंडावर गौण खनिज उत्खनन करुन त्याच भूखंडावर बांधकाम किंवा विकासकामासाठी वापरल्यास अशा गौण खनिजावर स्वामीत्व धन आकारण्यापासून सूट दिलेली आहे तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने बांधकाम करताना खोदकामामुळे निघालेले दगडमाती हे त्याच भूखंडावर जमीन सपाटीकरणासाठी वापरल्यास ते स्वामित्वधनाच्या आकारणीसाठी गौण खनिज या व्याख्येमध्ये मोडत नाहीत. अशा स्वरुपाचा निर्वाळा एका याचिका प्रकरणी दिलेला आहे. या पार्श्वभूमीवर खराबवाडी परिसरातील चाकण एम.आय.डी.सी. मधील उद्योगांनी उद्योग उभारणीसाठी जमीन सपाटीकरणासाठी वापरलेल्या गौण खनिजाबाबत स्वामित्वधन आकारण्याची कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वीज चोरीला कायमस्वरुपी आळा बसण्यासाठी सक्षम यंत्रणा**
**महावितरणाने निर्माण करण्याबाबत**

**(३७) * १२८१२ श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई परिक्षेत्रातील मुंबई उपनगर व ठाणे, नाशिक, रायगड व पालघर जिल्ह्यात महावितरणच्या दक्षता विभागाने ०९/०२/२०१५ रोजी वा त्यासुमारास वीज चोरी करणा-यांवर धाडी टाकुन ३ कोटी ९८ लाख रुपयांची वीज चोरी पकडली आहे, हे खरे काय,

(२) असल्यास, या परिसरात याहीपेक्षा मोठया प्रमाणात वीज चोरी केली जाते, हे ही खरे आहे

काय,

(३) असल्यास, वीज चोरी करणा-यांमध्ये किती उद्योग-धंदे व समुहांचा समावेश आहे व त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली आहे,

(४) वीज चोरीला कायमस्वरुपी आळा बसावा यासाठी कोणती कार्यवाही शासनाने केली वा करण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.

(२) नाही.

(३) कल्याण, भांडूप, नाशिक परिमंडळाच्या अखत्यारितील मुंबई उपनगर व ठाणे, नाशिक, रायगड व पालघर जिल्ह्यात सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये एकूण ३०७८४ वीज चो-या निदर्शनास आल्या असून २६१७ एवढ्या वीज ग्रहकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. विविध प्रकरणी चोरी करणा-या ग्राहकांकडून रु. १०४०.६७ लाख इतकी रक्कम वसुल करण्यात आली आहे.

(४) वीज चोरी प्रकरणांत वीज बिल निर्धारण करताना वीज दराच्या दिडपट इतक्या दराने आकारणी करण्यात येते. निर्धारण करणे. विजचोरीची प्रकरणे उघडकीस आणण्यासाठी फिरत्या पथकांमार्फत खास तपासणी मोहिम राबविण्यात येते. प्रविभागीय/ विभागीय/ उपविभागीय पातळीवर एनर्जी ऑडीट करण्यात येते ग्राहकांच्या मिटर बॉक्स व मिटर टर्मिनलला सुरक्षा मोहर लावले जातात. तसेच ग्राहकांच्या मिटरला ज्या सी.टी. द्वारे द्वीतीय बाजूस वीज पुरवठा दिला जातो त्या सर्व भागास वेल्ड केले जाते. आधुनिक प्रकारची इलेक्ट्रॉनिक मिटर्स वापरण्यात येत असून ह्या मिटरमध्ये ४५ ते ६० दिवसांची मागील संपूर्ण माहिती व वीज वापर अथवा ग्राहकाने लबाडीच्या उद्देशाने काही फेरफार केला असल्यास त्याची नोंद होते. तसेच किऑस पध्दतीच्या मिटर्स सीस्टमचा वापर सूरु आहे. विज चोरीस आळा घालून, त्यावर कायदेशीर कारवाई त्वरीत होण्यासाठी राज्यात विशेष न्यायालय म्हणून पदनिर्देशित करण्यात आली आहेत तसेच विजचोरी प्रकरणाचा लवकरात लवकर तपास पूर्ण करण्यासाठी राज्यात कल्याण, पुणे, नाशिक, नागपूर, जालना व लातूर या ठिकाण वितरण कंपनीचे विशेष पोलीस ठाणे कार्यरत करण्यात आली आहेत.

-----------------

### आमगाव परिसरातील चिरंचाळबांध (जि.भंडारा), देवाडा (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) परिसर तसेच यवतमाळ जिल्ह्यातील नऊ तालुक्यांमध्ये संबंधीत अधिकाऱ्यांच्या संगनमताने अनधिकृतरित्या गौण खनिजांचे उत्खनन सुरु असल्याबाबत

**(३८) * ५४९८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमगाव परिसरातील चिरंचाळबांध (जि.भंडारा), देवाडा (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) परिसर

तसेच यवतमाळ जिल्ह्यातील नऊ तालुक्यांमध्ये संबंधीत अधिका-यांच्या संगनमताने अनधिकृतरित्या गौण खनिजांचे उत्खनन केले जात असल्याचे माहे जानेवारी,२०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोठ मोठे दगड फोडण्यासाठी स्फोटकांचा वापर करण्यात येत असल्यामुळे आजूबाजूच्या परिसरातील अनेक घरांना तडे गेले असून नागरिकांचे जीवन धोक्यात आल्याचे उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशी अंती या प्रकरणी दोषी अधिकारी व कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) प्रश्नाधिन भागात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, अधिका-यांच्या संगनमताने अनधिकृतरित्या गौण खनिजांचे उत्खनन केले जात असल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(२) सदर भागात अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) गोंदिया, चंद्रपूर व यवतमाळ या जिल्ह्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी तालुका व जिल्हा स्तरावर भरारी पथके गठीत करण्यात आलेली असुन, अशा भरारी पथकांकडून गोंदिया जिल्ह्यातील आमगांव तालुक्यात माहे जानेवारी २०१५ मध्ये केलेल्या तपासणीत १७ गौण खनिजांच्या प्रकरणांत रुपये १,४७,५००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यातील मौजे देवाडा येथे माहे फेब्रुवारी २०१५ मध्ये केलेल्या तपासणीत २ प्रकरणांत रुपये ६,४००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. यवतमाळ जिल्ह्यात माहे जानेवारी २०१५ मध्ये केलेल्या तपासणीत १०६ प्रकरणांत रुपये ८,५९,४३०/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती शहरात वाहनाद्वारे होणारे प्रदुषण रोखण्याबाबत

**(३९) * ५६८७ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरात दररोज १ लाखांवर वाहनांची वर्दळ असून वाहन प्रदुषणरहित असावे असा दंडक असला तरी प्रादेशिक परिवहन विभागाचा 'पीयुसी' केंद्रावर कोणताच अंकुश नसल्याने कोणतेही निकष न पाळताच पीयुसी दिली जात असल्याने शहरातील वातावरण प्रदुषीत करणारी वाहने धावत असल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणातील वाहनाद्वारे प्रदुषणास कारणीभूत ठरत असलेले 'पीयुसी' केंद्रावर कारवाई करण्याबाबत तसेच वाहनांच्या माध्यमातून होणार प्रदुषण रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) होय, खरे आहे.

दिनांक २१.१.२०१५ च्या आदेशान्वये अमरावती जिल्हयातील एकूण १७ मान्यताप्राप्त वायु प्रदुषण नियंत्रण तपासणी केंद्रांची विशेष तपासणी मोहिम राबविण्यात आली. त्यानुसार दोषी आढळून आलेल्या एका तपासणी केंद्रावर कारवाई करण्यात आलेली असून त्या केंद्राचे प्राधिकार प्रमाणपत्र दिनांक ०२.०२.२०१५ च्या आदेशान्वये रद्द करण्यात आलेले आहे.

वाहनाच्या माध्यमातुन होणारे वायु प्रदुषण रोखण्यासाठी अमरावती कार्यालयाच्या भरारी पथकाद्वारे नियमित कारवाई करण्यात येत असून दि. १ एप्रिल २०१४ ते २८ फेब्रुवारी २०१५ या कालावधीमध्ये प्रदुषण विषयी नियमांचा भंग करणा-या व प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र न बाळगणा-या २७६८ वाहनांवर कारवाई करण्यात आली असुन रु. २१,७४,६०० एवढे तडजोड शुल्क वसुल करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तहसिलदार (ता.माजलगांव, जि.बीड) यांचेवर वाळू माफियांनी हल्ला केल्याबाबत**

**(४०) * ७८४३ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोदावरी पात्रातून (ता.माजलगांव, जि.बीड) वाळू उपशांची मुदत संपलेली असताना वाळू उपसा होत असल्याप्रकरणी कारवाई करण्यासाठी खाजगी वाहनातून गेलेल्या तहसिलदारावर वाळू माफियांनी दिनांक २३ डिसेंबर, २०१४ रोजीच्या सुमारास हल्ला केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने वाळू माफियांना अटक करण्यात आली आहे काय व त्यानुसार कोणत्या कलमान्वये वाळू माफियांवर गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी दि. २३.१२.२०१४ रोजी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. ००/२०१४ अन्वये तक्रार नोंदविण्यात आली. तथापि, सदर घटना ही तलवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने तलवाडा पोलीस ठाणे येथे दि. २४.१२.२०१४ रोजी गुन्हा नोंद क्र. १४०/२०१४ कलम ३५३,३३२,३२३,५०४,५०६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. गुन्हयाच्या तपासात आरोपीस अटक करण्यात आली आहे.
(३) विलंब झालेला नाही.

-----------------

**लांजा (जि.रत्नागिरी) येथील बसस्थानकाचे आधुनिकीकरण करण्याबाबत**

**(४१) * १२४०४ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गावरील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या लांजा (जि.रत्नागिरी) बस स्थानकाच्या इमारतीचे आधुनिकीकरण करुन या ठिकाणी जिल्हयातील पहिले अद्यावत व सर्वात मोठे मध्यवर्ती बस स्थानक नव्याने उभारण्याबाबत एस.टी. महामंडळाने पाच वर्षापूर्वी निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एस.टी. महामंडळाने पाच वर्षापूर्वी घेतलेल्या निर्णयाची अद्यापी अंमलबजावणी झाली नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, लांजा बस स्थानकाची सध्याची वास्तू ही जुनी असून बस स्थानकातील स्वच्छतागृहांची दुरावस्था, पिण्याच्या पाण्यासाठी असलेल्या टाक्यांची अस्वच्छता, एस टी पास तसेच तिकिटे काढण्यासाठी असणारी अपुरी व्यवस्था अशा अनेक गैरसोयी असतांनाही ह्या बस स्थानकाच्या नुतनीकरणाकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) चौकशीअंती अजुनपर्यंत नुतनीकरण तसेच सुविधा देण्याबाबत विलंब करणाऱ्या जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) लांजा येथील राज्य परिवहन बसस्थानक सन १९७७ पासून कार्यान्वित आहे. सदर बसस्थानक तीन फलाटांचे असून जुने झालेले आहे. बसस्थानकातील प्रवाशांकरीता बांधलेल्या पिण्याच्या पाण्याची टाकी. प्रसाधनगृह यांचे वेळोवेळी नियमित डागडुजी करुन वापर करण्यात येत आहे. तसेच बसस्थानकाची नियमित स्वच्छता करुन घेतली जाते. बसस्थानकात पास व आगाऊ आरक्षण करण्याची व्यवस्था केलेली असून तेथे पास व आगाऊ आरक्षण करण्याची सेवा नियमित सुरु आहे. तसेच बसस्थानकातील वाहनतळाचे डांबरीकरण करण्यात आले आहे.

महामंडळाची आर्थिक स्थिती बिकट असल्याने बसस्थानकाच्या नूतनीकरण करण्याबाबत अद्याप निर्णय घेण्यात आलेला नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना जिल्ह्यातील भाटेपुरी येथील स्वातंत्र्य सैनिकाचा भाचा असल्याच्या खोटया प्रमाणपत्रावर तलाठी पदावर नौकरी करीत असल्याबाबत

**(४२) * ५४९९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.विजयकुमार गावीत (नंदुरबार), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यातील भाटेपुरी येथील स्वातंत्र्य सैनिक मनोहर धनाजी बोंदरे यांचा भाचा असल्याचे बनावट कागदपत्राच्या आधारे स्वातंत्र्य सैनिकाच्या कोट्यातून पांडूरंग भोसले हा मानेपुरी, धनसांवगी, (जि. जालना) येथे गेल्या पंचविस वर्षापासून तलाठी पदावर नौकरी करीत असल्याची माहिती दिनांक २० जानेवारी २०१५ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी जालना यांनी समितीद्वारे केलेल्या चौकशीत पांडूरंग भोसले यांनी बनावट कागदपत्राच्या आधारे शासकीय नौकरी मिळविल्याचे निदर्शनास आल्यानंतर सुध्दा त्यांच्यावर अद्यापही कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गंभीर प्रकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) स्वातंत्र्य सैनिक, श्री.मनोहर धनाजी बोंदरे, रा.भाटेपुरी, ता.जि. जालना यांनी त्यांच्या बहिणीचा मुलगा म्हणून श्री.पांडुरंग नरसिंगराव भोसले यांना दिलेल्या नामनिर्देशन पत्रानुसार, श्री.भोसले यांना शासन सेवेत 'तलाठी' या पदावर १९९० साली नियुक्ती देण्यात आली आहे. मात्र तक्रारदार, श्री.पी.एन.मोने, औरंगाबाद यांनी श्री.भोसले यांनी सादर केलेल्या सदर नामनिर्देशन पत्रासंदर्भात चौकशी करण्याची विनंती केली होती.

त्या अनुषंगाने शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २४.६.१९९७ च्या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी, जालना यांनी अप्पर जिल्हाधिकारी, जालना यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीमार्फत सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली. चौकशीअंती स्वातंत्र्य सैनिक, श्री.मनोहर धनाजी बोंदरे यांनी श्री.पांडुरंग नरसिंगराव भोसले यांना दिलेले नामनिर्देशन पत्र हे अवैध / अविधीग्राह्य असल्याचे सिध्द झालेले आहे.

त्याअनुषंगाने सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, अंबड यांनी दि. ५.२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकरण शासनास सादर केले आहे. सदर प्रकरणासंदर्भात शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वर्धा व चंद्रपूर जिल्ह्यात बनावट क्रमांकाची वाहने जप्त केल्याचे निदर्शनास आल्याबाबत**

**(४३) * ५६९० प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा व चंद्रपूर जिल्ह्यात बनावट क्रमांकाचे वाहने जप्त केल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्क्रॅप झालेली वाहने विकत घ्यायची त्यावर बनावट क्रमांक आणि बनावट कागदपत्रे बनवून त्यांचा सर्रास वापर करण्याचा प्रकार विदर्भात मोठ्या प्रमाणात सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विदर्भात चालू असलेला प्रकार थांबविण्याबाबत तसेच संबंधितांविरुध्द शासनस्तरावरुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) वर्धा जिल्ह्यात अशी बाब निदर्शनास आली आहे. तथापि, चंद्रपूर जिल्ह्यात असे आढळून आले नाही.

(२) नाही.

(३) व (४) वर्धा जिल्ह्यात बनावट सांगाडा (चेसिस) क्रमांक असलेल्या मोटार वाहन क्रमांक CG-०४G-६३७४ च्या वाहन मालकाविरुध्द दि. ६.१.२०१५ रोजी सेवाग्राम पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.०६/१५ भा.दं.वि.कलम ४२०, ४८६, ४७१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासाधीन आहे. तसेच सदर प्रकरणी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, वर्धा यांचेकडून त्यांच्या कार्यालयीन तपासणी पथकास अशी वाहने आढळून आल्यास कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.